दैनिक
wwww.lokaarambh.com
# लोक आरंभ
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक १०८ | बुधवार ८ एप्रिल २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रु
Beed | year - 04 th | Issue108 | Wednesday 8 April 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# श्रीक्षेत्र नारायणगडाच्या ७४ व्या नारळी सप्ताहाची सांगता; भाविकांच्या जनसागराने उमापूर दुमदुमले

**उमापूरकरांचे शिस्तबद्ध नियोजन**
सप्ताह काळात आलेल्या लाखो भाविकांसाठी भोजन आणि पाण्याची व्यवस्था करण्यासाठी गावातील आबालवृद्धांनी अहोरात्र श्रम घेतले. शिस्तबद्ध रांगा आणि भक्तीचे वातावरण यामुळे या सप्ताहाला एक वेगळेच स्वरूप प्राप्त झाले होते. सप्ताहाच्या सांगतेनंतर झालेल्या महाप्रसादाचा लाभ लाखोंच्या संख्येने भाविकांनी घेतला.

गेवराई (प्रतिनिधी):
मराठवाड्याची पावन भूमी ही संत-महंतांची कर्मभूमी आहे. जगाच्या कल्याणासाठी संतांनी दिलेला समतेचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. सर्व जाती-धर्माला सोबत घेऊन चालण्याची श्रीक्षेत्र नारायणगडाची देदीप्यमान परंपरा असून, हा वारसा सर्वांनी जपला पाहिजे, असे प्रतिपादन गडाचे महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांनी केले.

गेवराई तालुक्यातील उमापूर येथे आयोजित श्रीक्षेत्र नगद नारायण गडाचा ७४ वा भव्य नारळी सप्ताह मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनासाठी आणि महाप्रसादासाठी भाविकांचा अथांग जनसागर लोटला होता.

भक्ती आणि समतेचा संदेश
काल्याच्या कीर्तनाप्रसंगी शिवाजी महाराज यांनी 'नंदाच्या घराला । मज नेई गोकुळाला ।।' या अभंगावर निरूपण केले. ते म्हणाले की, "नगद नारायण महाराजांची सेवा ही प्रत्यक्ष ईश्वराची सेवा आहे. समाजात वावरताना प्रत्येकाने नम्रता आणि लीनता




बाळगावी. तरुणांनी या भक्ती सोहळ्यांतून संस्कार घेऊन गाय आणि आईची सेवा करावी, तसेच 'रामकृष्ण हरी' नामाचा जप करावा." दिग्गजांची उपस्थिती
या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. यामध्ये प्रामुख्याने:
आमदार धनंजय मुंडे, खासदार निलेश लंके, आमदार विजयसिंह पंडित.
महंत दत्ता महाराज गिरी (गोरक्षनाथ संस्थान), माजी मंत्री बदामराव पंडित.
नामदेव महाराज शेकटेकर, उत्तराधिकारी संभाजी महाराज, आणि इतर अनेक संत-महंत.
जिल्हाध्यक्ष चंद्रकांत नवले, राजेंद्र मस्के, युवा नेते रोहित पंडित यांसह अनेक प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. नियोजित ७५ वा अमृतमहोत्सवी सप्ताह नारायणगडावर यावेळी ७४ व्या सप्ताहाच्या यशस्वीतेबद्दल बोलताना महाराजांनी उमापूर आणि मारोतीचीवाडी येथील ग्रामस्थांच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले. गेल्या सहा महिन्यांपासून ग्रामस्थ या कार्यासाठी झटत होते. कीर्तनानंतर शिवाजी महाराजांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली: "पुढील वर्षीचा (२०२७) ७५ वा अमृतमहोत्सवी नारळी सप्ताह खुद्द श्रीक्षेत्र नारायणगडावरच साजरा केला जाईल."

## मका खरेदीस जिल्हाधिकारी अनुकूल -रमेश कदम पाटील

जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : मका पिकाचा पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांनी शासनाने हमीभावाने मका खरेदी करावी व इतर मागण्यांसाठी २०- मार्च रोजी बोधडी येथे शेतकरी संघटनेने रास्ता रोको आंदोलन केले होते. या आंदोलनात तहसीलदारांच्या वतीने मका खरेदी व इतर मागण्यांबाबत संबंधित विभागांची व शेतकरी संघटनेची संयुक्त बैठक लावण्याचे आश्वासन देण्यात आले होते. शेतकऱ्यांचे मका पीक घरात येऊन पडले तरीही प्रशासन अजून प्रतिसाद देत नाही, म्हणून स्मरण करून द्यायला गेलेला शेतकऱ्यांना 'हा प्रश्न माझ्या विभागाशी संबंधित नाही, मी यासाठी बांधील नाही', असे म्हणत तहसीलदाराने हात झटकले.व्यथित झालेल्या शेतकऱ्यांनी किनवटचे उपविभागीय अधिकारी झेनित चंद्रा दोनतुल्ला यांची भेट घेतली.अत्यंत संवेदनशील पणे त्यांनी हा मुद्दा समजावून घेऊन आंदोलनाची गरज पडणार




नाही अशी भूमिका घेतली. तात्काळ नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचेशी फोनवर संवाद साधला व शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. जिल्हाधिकारी महोदयांनी शेतकऱ्यांना लगेच आपल्या दालनात बैठकीस बोलावले. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी जगदीश बारदेवाड यांनी शेतकऱ्यांची बैठक घेत तालुक्यातील मका पिकाच्या खरेदी संदर्भात विविध विभागाचा आढावा घेतला.मका खरेदीसाठी शासन अनुकूल असून साठवणुकीसाठी गोडाऊन, खरेदीसाठी मनुष्यबळ, विविध खरेदी एजन्सीची उपलब्धता याबद्दल अहवाल मागवण्यात आला. प्रत्यक्ष जिल्हा पुरवठा अधिकारी शनिवारी किनवट तालुक्याचा दौरा करून पाहणी करणार आहेत. किनवट तालुक्यात किती मका असुद्या शासन खरेदी करणार आहे. असे यावेळी पुरवठा अधिकारी म्हणाले. बोगस खरेदी संदर्भात संघटनेने तक्रार केली असता शेतकऱ्यांनी दलालांना आपला सातबारा देऊ नये असे आवाहन यावेळी केले.

किनवट उपविभागीय अधिकारी यांनी दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता यामुळे त्यांनी शेतकऱ्यांची मने जिंकले.१३ तारखेला बोधडी (बु) येथे व १५ तारखेला किनवट येथे होणारे रास्ता रोको आंदोलन टळले आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील यांनी दिली. नांदेड येथे झालेल्या बैठकीत संघटनेच्या वतीने केंद्रीय एम एस पी कमिटीचे सदस्य गुणवंत पाटील हंगरगेकर, शिवाजीराव शिंदे उंचेगांवकर, रमेश कदम पाटील, ज्ञानेश्वर आनकाडे, बाळू मुंडे, बाबु डोंगरे, नारायण भिसे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## शेख रुकसार युनुस पुणे शहर पोलिस दलात निवड



सामाजिक चळवळीतील सहकारी मित्र शेख युनुस च-हाटकर यांची मुलगी शेख रूक्सार युनुस पुणे शहर पोलिस दलात निवड हृद्यसत्कार समारंभ...आज दि.०८ बुधवार रोजी सकाळी ११ वाजता बीड येथील शासकीय विश्रामगृहात सामाजिक चळवळीतील आपले सहकारी शेख युनुस च-हाटकर यांची मुलगी शेख रूक्सार युनुस हिची महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत पुणे शहर पोलिस दलात निवड झाली असून अत्यंत प्रतिकूल परिस्थिती तिने मिळवलेल्या यशाबद्दल चळवळीतील सर्व सहकाऱ्यांच्या वतीने आज तिचा व कुटुंबातील सदस्यांचा हृद्यसत्कार करण्यात येणार असुन चळवळीतील सहकारी मित्रांनी उपस्थित रहावे....
डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

# मोहरी तलाव दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर; तातडीने काम न झाल्यास पूर-दुष्काळाचे दुहेरी संकट


**आ. रोहित पवार यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश; जामखेड तालुक्यातील दहा गावांचा पाणीपुरवठा धोक्यात**

खर्डा ( प्रतिनिधी ) जामखेड तालुक्यातील मोहरी लघु पाटबंधारे प्रकल्पाची दुरवस्था गंभीर बनली असून, त्याच्या तातडीच्या दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर आ. रोहित पवार यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. खर्डा सहित सुमारे दहा गावांचा पाणीपुरवठा या तलावावर अवलंबून आहे. बालाघाट डोंगररांगांनी वेढलेल्या या प्रकल्पामुळे कमी पावसातही पाणी साठते, त्यामुळे परिसरातील शेती व पिण्याच्या पाण्यासाठी हा तलाव महत्त्वाचा स्रोत मानला जातो. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे तलावाच्या भरावाच्या भिंतीला मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्तीचे प्रयत्न करण्यात आले होते; मात्र कायमस्वरूपी उपाययोजना अद्याप झालेली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी झाल्याची नोंद आहे. दरम्यान, या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी आ. रोहित पवार यांना निवेदन दिले. त्यानंतर आ. पवार यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत धुमाळ यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून दुरुस्तीची मागणी केली. यासंदर्भात अधिकृत पत्रही सादर करण्यात आले आहे.
सध्या एप्रिल महिना सुरू असूनही दुरुस्तीचे काम सुरू झालेले नाही. पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न झाल्यास भराव पुन्हा वाहून जाण्याची तसेच खालच्या भागातील गावांना पूराचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, दुष्काळी परिस्थितीत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी मोहरी तलाव हा प्रमुख आधार राहिला आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्याची मागणी स्थानिक स्तरावरून होत आहे. तसेच नायगाव प्रकल्पालाही झालेल्या नुकसानीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.
स्थानिक प्रशासनाने या परिस्थितीची दखल घेऊन तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्य मदन गोलेकर पाटील, वैभव जमकावळे, श्रीकांत लोखंडे, खर्डा सोसायटीचे चेअरमन सुहास गोलेकर पाटील, राष्ट्रवादी युवकचे तालुका उपाध्यक्ष गणेश ढगे, ओंकार इंगळे, बाबु गटकळ हे उपस्थित होते.



## मुस्लिम पुरुषाने दुसरं लग्न केले तर... हायकोर्टाचा महत्वाचा निकाल

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने द्विविवाहाच्या मुद्द्यावर अत्यंत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, एखाद्या मुस्लिम पुरुषाचे पहिले लग्न वैध असतानाही त्याने दुसरे लग्न केल्यास भारतीय दंड संहितेच्या कलम ४९४ अंतर्गत द्विविवाहाचा गुन्हा लागू होत नाही. न्यायमूर्ती बी. पी. शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले की, कलम ४९४ तेव्हाच लागू होते जेव्हा पहिल्या लग्नाच्या अस्तित्वात दुसरे लग्न कायदेशीरदृष्ट्या अवैध ठरते. मात्र मुस्लिम वैयक्तिक कायद्यानुसार पुरुषाला बहुपत्नीत्वाची परवानगी असल्याने, दुसरे लग्न आपोआप अवैध ठरत नाही. त्यामुळे या कलमाखाली गुन्हा दाखल करता येत नाही. न्यायालयाने याचिकाकर्त्याची याचिका स्वीकारली आणि त्याच्यावरील द्विविवाहाचा आरोप पूर्णपणे रद्द केला. मात्र, भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ (पत्नीवर अत्याचार), ३४२ (बेकायदेशीर कैद), ३२३ (जखम करणे) आणि ५०६ (भाग २) (धमकी) अंतर्गत दाखल केलेले इतर गुन्हे कायम ठेवण्यात आले आहेत. या गुन्ह्यांवरील सुनावणी कनिष्ठ न्यायालयात सुरू राहणार आहे प्रकरणाची पार्श्वभूमी या प्रकरणात याचिकाकर्त्याच्या पत्नीने आरोप केला होता की, २००२ मध्ये विवाह झाल्यानंतर मुलबाळ न झाल्याच्या कारणावरून तिच्यावर शारीरिक आणि मानसिक अत्याचार करण्यात



आला. तसेच २०२२ मध्ये पतीने दुसरे लग्न केले आणि तिला 'खुला'द्वारे घटस्फोट देण्यासाठी दबाव टाकला होता.. न्यायालयाचा युक्तिवाद आणि निर्णय याचिकाकर्त्याच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, मुस्लिम वैयक्तिक कायद्यानुसार एका पुरुषाला एकावेळी चार पत्नी ठेवण्याची परवानगी आहे. त्यामुळे कलम ४९४ लागू होऊ शकत नाही. त्यांनी केरळ उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाचा संदर्भही दिला. दुसरीकडे, पत्नीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, बहुपत्नीत्वाचा लाभ घेण्यासाठी काही अटी पूर्ण होणे आवश्यक आहे, त्यामुळे याचिकाकर्त्याला हा लाभ मिळता कामा नये.

## समाजात एकोपा व संवाद ठेवायचा असेल तर कुटुंब मेळावे आवश्यक -इंजि.चंद्रशेखर शिखरे

जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : मराठा सेवा संघ नांदेड आयोजित शिवकुटुंब मेळावा हॉटेल ताज पाटील येथे नुकताच पार पडला.या शिवकुटुंब मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष डॉ.पंजाबराव चव्हाण उद्घाटक मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजीराव पवार प्रमुख मार्गदर्शक मराठा सेवा संघाचे महासचिव इंजि.चंद्रशेखर शिखरे इंजि.शिवाजीराजे पाटील प्रमुख पाहुणे प्रा.अर्जुनराव तनपुरे, डॉ सोपानराव क्षिरसागर, इंजि.व्हि टी शिंदे,इंजि शेरा पाटील उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवरायांना अभिवादन करून व जिजाऊ वंदनेने झाली. रेणुका कौशल्य यांनी जिजाऊ वंदना गायली कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अँड.सतीशकुमार जाधव यांनी केले.
माणसातील संवाद लुप्त होत चालला आहे.माणूस माणसाशी जोडला जावा समाजाचा निरंतर विकास व्हावा या उद्देशाने मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अँड.पुरुषोत्तम खेडेकर यांनी कुटुंबांना एकत्रित आणण्यासाठी ही संकल्पना मांडली त्या दिशेने प्रयत्न देश व राज्य पातळीवर असे मिळावे होणे गरजेचे आहे.असे मत आपल्या प्रास्ताविकतेतून मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सतिशकुमार जाधव यांनी व्यक्त केले.तर स्वागतपर मनोगत मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडितराव यांनी केले कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पंजाबराव चव्हाण यांनी कुटुंबाचे मानवी जीवनातील महत्त्व,





कुटुंबातील तरुणांचे स्थान, बेरोजगारी दिशाहीन झालेला तरुण, गुन्हेगारीचे वाढते प्रमाण यावर लक्ष वेधले.तर उद्घाटक कामाजीराव पवार यांनी कुटुंब एकत्रीकरणाचे फायदे व कुटुंब विकासावर संकल्पना मांडली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक इंजि.चंद्रशेखर शिखरे यांनी कुटुंबाचे महत्त्व, मातृसत्ताक कुटुंब पद्धती, कुटुंबाला जोडण्यात स्त्रियांचे स्थान आणि वर्तमान महाराष्ट्रातील खरात प्रकरणासारखी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून स्त्रियांची भूमिका, पुरुषा आणि स्त्री यातील दुराव्याचे ,कलहाचे, स्त्रियांच्या कुचंबनेचे फलित म्हणजे अशी प्रकरणे आहेत अशी स्पष्ट शब्दात सुंदर मांडणी केली ,त्याचबरोबर सहभागी कुटुंबीयांसोबत संवाद साधला. समारोपीय सत्रात इंजि. शिवाजीराजे पाटील यांनी स्वतःवर प्रेम करण्याचा सल्ला व आरोग्य विषयक सल्ला देऊन .एकमेकांविषयी बोलण्यापेक्षा आपण एकमेकांशी बोललो तर गैरसमजामुळे मुळे होणारे अंसख्य प्रश्न सहजपणे सुटू शकतात असे सांगितले शिवकुटुंब मेळावा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गजानन इंगोले यांनी केले तर आभार राम डाखोरे यांनी मानले. या कार्यक्रमास नानाराव कल्याणकर,उद्धवराव सूर्यवंशी,शिवाजीराव आलेगावकर ,पंडितराव कदम,प्रा अशोक खुडे,प्रा.दगडू भरकड,संभाजी ब्रिगेडचे लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील जिल्हा सचिव बालाजी पाटील सिरसाट जिजाऊ ब्रिगेडच्या माजी जिल्हाध्यक्षा सुरेखा रावणगावकर, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा कल्पना चव्हाण व सुमित्रा वडजकर, सुनीता कल्याणकर, डॉ . सत्यभामा जाधव,राणी दळवी, प्रा प्रतिभा खुडे यांच्यासह शिवकुटुंब मेळाव्यास ७० कुंटुबे उपस्थित होती.

दैनिक लोकआरंभ
बुधवार ८ एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



सं पा द की य

# अहवालाचे अंजन “

प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी 8055440385

.” धोरणकर्त्यांच्या डोळ्यात अंजन घालणाऱ्या या विचारप्रवर्तक लेखाचा सुसूत्र,सविस्तर गोषवारा असा:—

देशातील पारंपारिक अभ्यासक्रमाचे आपल्या राज्याचे वास्तव आहे. राज्यात शंभर टक्के विद्यार्थी प्रवेश झालेला एकही अभ्यासक्रम नाही हे वास्तव आहे. अगदी हाताला काम देणारा अभ्यासक्रम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पदव्यांची कमी-अधिक हीच परिस्थिती आहे. राज्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा विचार करता १लाख७७हजार ४१५जागापैकी २५ हजार ८२२ जागा रिक्त आहेत.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी क्षमता १० हजार ६८६ असताना ५ हजार २८ जागा रिक्त आहेत.कला शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी क्षमता ४ लाख ५७हजार ८५३ विद्यार्थ्यांची असताना प्रत्यक्षात १ लाख ७९ हजार ६९८ जागा रिक्त आहेत, पदव्युत्तर पदवीसाठी क्षमता ४९ हजार २०७ असून येथेही १९ हजार ८२९ जागा रिक्त आहेत. वाणिज्य शाखेत पदवी अभ्यासक्रमासाठी क्षमता ३लाख ८९ हजार ९२९ असताना येथे असताना एकूण १ लाख ४६ हजार ४०६ जागा रिक्त आहेत.पदव्युत्तर पदवीची क्षमता ६१ हजार २२५ असताना येथेही ३१ हजार ७७ जागा रिक्त आहेत. दुसरीकडे जे विद्यार्थी हातात पदवी घेऊन बाहेर पडत आहेत,त्या विद्यार्थ्यांच्या हाताला काम नाही.पदवी असली तरी ती केवळ साक्षरतेचा पुरावा आहे तो कामाचा नाही. हे चित्र सरकारचे शिक्षणाप्रती उदासीनता दाखवणारे आहे.देशात पदवीधारक असलेल्या ४० टक्के विद्यार्थ्यांच्या हाती कोणत्याही रोजगाराची वाट नाही.आजच शिक्षणात पदवी घेऊन रोजगार मिळणार नसेल, तर आज महाविद्यालयांमध्ये जितकी रिक्त संख्या आहे,त्यापेक्षा कितीतरी संख्या रिक्त राहण्याचा धोका आहे.त्यातून पुन्हा अनेक महाविद्यालये बंद होतील.महाविद्यालये बंद झाली,तर पुन्हा शिक्षण महाग होण्याचा धोका आहे.त्यातून मक्तेदारी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


देशात अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या वतीने २०२६ च्या अहवालाचे निष्कर्ष नुकतेच जाहीर करण्यात आले आहेत.त्यानुसार देशात तरूण बेरोजगाराची समस्या अत्यंत गंभीर आहे. देशातील उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचा सहभाग फारसा उंचावलेला नाही.तो टक्का उंचावण्याचे मोठे आव्हान आहे.पदवीधर असूनही जर रोजगार मिळण्याची क्षमता त्यातून प्राप्त होणार नसेल,तर भविष्यात हे बेरोजगारीचे चित्र आणखी गडद होण्याची शक्यता आहे.आज देशात केवळ ३० टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणात सहभागी आहेत आणि त्यांनाही रोजगार मिळून देण्याची शक्ती शिक्षणात नाही,भविष्यात १०० टक्के विद्यार्थी पदवीधर झाले,तर बेरोजगारीचे चित्र किती भयंकर असेल याचा अंदाज न केलेला बरा.आज शिक्षणातून आपण केवळ  साक्षरतेचा राक्षस तयार करत आहोत का ? असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे.


या सर्वेक्षणात एक निष्कर्ष नोंदवण्यात आला आहे.तोही धक्कादायक आहे. शिक्षणात हाताला काम मिळून देण्याची क्षमता नसल्याने उच्च शिक्षणात दाखल होऊनही बाहेर पडण्याचे प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होते आहे.हे वाढते आकडे देशासमोर प्रश्न निर्माण करणारे ठरणार आहेत.त्यामुळे हा अहवाल गंभीरपणे घेण्याची गरज आहे.या अहवालातून देशातील शिक्षणाचे अत्यंत विदारक वास्तव समोर आले आहे.बेरोजगारीची समस्या शहरी भागांपेक्षा ग्रामीण भागात कमी आहे.शहरांमध्ये रोजगाराची नोंद कमी झाल्याचे दिसून येते आहे.ग्रामीण भागात शेती व त्यासंबंधित रोजगार किमान उपलब्ध आहे.मात्र शहरी भागातील उद्योग व्यवसायाला मर्यादा आल्या आहेत.नव्या तंत्रज्ञानाने नोकऱ्यांची संख्या घटत चालली आहे.सेवा क्षेत्रातील नोकरीचे प्रमाण घटते आहे.शहरातील रोजगार आटत चालला असल्याचे वास्तव समोर आले आहे.शिक्षणातून कौशल्य विकासाची पेरणी होत नाही.त्यामुळे हाताला रोजगार नाही. रोजगार नाही म्हटल्यावर त्याचा परिणाम आर्थिक विकासावर होत राहणार यात शंका नाही.

नोकरी न मिळाल्यामुळे बेरोजगार तरूण तणावग्रस्त होतात, नैराश्य व उदासिनतेमुळे आत्महत्येचा मार्ग अनुसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याच बरोबर अनेकदा वैफल्यातून ते गुन्हेगारीची वाट चालण्याची शक्यता आहे.हिंसाचार,धार्मिक संघर्षात वाढ होण्याची शक्यता आहे.त्यातून सामाजिक स्वास्थ्य बिघडू शकते. हे उत्पादनक्षम हात मग आपोआपच कोणत्याही उत्पादन विकसित क्षमतेत हातभार लावू शकत नाहीत. त्यामुळे रोजगार वाढविण्याची व्यवस्था सरकारकडून विविध मार्गाने निर्माण केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. आपल्याला आपली सरकारी धोरणे,कौशल्य विकास कार्यक्रम आणि उद्योजकतेस प्रोत्साहन देणाऱ्या धोरणाची वाट चालावी लागणार आहे. सरकारने शिक्षणातून नोकरी निर्मितीच्या दृष्टीने कौशल्य विकसनासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने आपण आजच काय करणार आहोत, त्यावरच उद्याचा भविष्यकाळ अवलंबून असणार आहे.हा अहवाल म्हणजे एक प्रकारे इशारा आहे,तो समजून तो समजून घ्यायला हवा

# स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेतील 7 विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय व संत तुकाराम महाविद्यालय स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड








-----------------------------------

केज प्रतिनिधी: दि. ७ एप्रिल- जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ माध्यमिक विभाग ] या शाळेतील ७ विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर तसेच संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड झाली आहे.

यामध्ये- राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- श्रावण रामदास चाटे, आकांक्षा दीपक सांजुरे, प्रज्ञा दिनकर घुले, श्रेयश रघुनाथ बनसोडे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तर संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- सई बालाजी साखरे, ज्ञानदा सुनील गायकवाड, आयुष जयप्रकाश सातपुते या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

वरील विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार सचिव जी. बी. गदळे, सहसचिव तथा मुख्याध्यापक उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काझी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा शैलाताई इंगळे, स्वयंअर्थ शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायणराव अंधारे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राचार्य भैरट सर, प्राथमिक विभागाचे मु. अ. वसंत शितोळे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर जयंती सणाच्या निमित्ताने सर्व शिक्षकांचे वेतन 10 एप्रिल पर्यंत खात्यात जमा करा

## विनाअनुदानित शाळा कृती समितीचे शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना निवेदन

बीड दि.६ (प्रतिनिधी)- क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सणाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च -२०२६ चे वेतन १० एप्रिल पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी ‘बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती’च्या वतीने बीड शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सण तोंडावर आलेला असताना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना फुले आंबेडकर जयंती सण कसा साजरा करावा याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या जयंती सणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिक्षकांचे मार्च -२०२६ चे वेतन जयंतीपूर्वी, म्हणजेच १० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी  निवेदनाद्वारे केली. यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांनी  विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी बोलताना त्यांनी संच मान्यता आणि शिक्षक समायोजनाचा प्रश्न मार्गी लागण्याची प्रकिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया १० एप्रिल पर्यंत पूर्ण होईल. ही प्रक्रिया पूर्ण होताच सर्व शिक्षकांच्या खात्यावर वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम खाडे, प्रा. सोनवणे, अशोक मोरे, सुभाष मोरे, अभिमन्यू बोरखेडे, शिवप्रसाद सिरसाट, प्रा. ढास आणि प्रा. मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.




---------

# एल निनोचा परिणाम, यंदा मान्सून कमीच..; काय आहे ‘स्कायमेट’चा अंदाज...

## स्कायमेटच्या अंदाजाने बळीराजाची धाकधूक वाढली | सरासरी ९४ टक्के पर्जन्यमान होणार

विशेष बातमी प्रशांत बातमी

एल निनोचा परिणाम यंदा मान्सूनवर होणार असल्याचा अंदाज स्कायमेट या खासगी हवामान संस्थेने वर्तवला आहे. २०२६ मध्ये सरासरीपेक्षा यंदा कमी मान्सून पावसाचा अंदाज देखील स्कायमेटने वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीत मान्सून पर्जन्यमानाचा अंदाज सरासरीच्या ९४ टक्के वर्तवण्यात आला आहे.

हंगामाच्या दुसऱ्या सहामाहीत एल निनोची तीव्रता वाढण्याची शयता देखील वर्तवण्यात आली आहे. जून महिन्यात मान्सून तुलनेने स्थिर राहण्याची शक्यता असली, तरी जुलै ते सप्टेंबर या कालावधीत पावसाची तीव्रता कमी होण्याचा अंदाज आहे. देशातील मध्य आणि उत्तर-पश्चिम भागांमध्ये पावसाची कमतरता जाणवू शकते, ज्याचा शेती आणि जलस्रोतांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. भारतीय हवामान विभाग पुढील आठवड्यात मान्सून हंगामासाठीचा आपला पहिला अंदाज जाहीर करण्याची शयता आहे.
भारतात २०२६ मध्ये मान्सूनचा पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे, असा अंदाज खाजगी हवामान संस्था ’स्कायमेट’ने मंगळवारी (०७ एप्रिल) वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या पावसाळी हंगामाच्या उत्तरार्धात ’एल निनो’ या हवामान स्थितीमुळे पावसाचे प्रमाण घटण्याची शयता असल्याचे स्कायमेटने म्हटले आहे.




स्कायमेटच्या अंदाजानुसार, चार महिन्यांच्या या कालावधीत दीर्घकालीन सरासरीच्या (८६८.६ मिमी) ९४ टक्के पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभाग पुढील आठवड्यात मान्सूनचा आपला पहिला अधिकृत अंदाज जाहीर करण्याची शयता आहे. भारतातील एकूण वार्षिक पावसाच्या सुमारे ७० टक्के पाऊस हा जून ते सप्टेंबर दरम्यान पडणाऱ्या दक्षिण-पश्चिम मान्सूनमुळे मिळतो. देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असलेल्या कृषी क्षेत्रासाठी हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा आहे. देशातील १४० कोटींहून अधिक लोकसंख्येपैकी अर्ध्याहून अधिक लोक शेतीवर अवलंबून आहेत. खरीप हंगामातील बहुतांश पेरण्या जून आणि जुलै महिन्यात होत असल्याने मान्सूनचे वेळेवर आगमन आणि त्याचे वितरण हे कळीचे ठरते. साधारणपणे, दक्षिण-पश्चिम मान्सून १ जून रोजी केरळमध्ये दाखल होतो आणि १५ जुलैपर्यंत संपूर्ण देश व्यापतो.
काय आहे ‘एल निनो आणि ला निनो’
पॅसिफिक महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढणे, याला ’एल निनो’ म्हणतात. याचा भारतीय मान्सूनवर नकारात्मक परिणाम होतो आणि पाऊस कमी होतो. तर पॅसिफिक महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान कमी होण्याच्या स्थितीला ‘ला निना’ म्हणतात, ज्यामुळे मान्सूनला बळकटी मिळते आणि पाऊस चांगला होतो

# भोंदूबाबा खरात प्रकरणात एसआयटी प्रमुख पहिल्यांदाच माध्यमांसमोर पीडितांच्या धाडसामुळेच तपासाला दिशा;

## आत्तापर्यंत 4650 अक्षेपार्ह लिंक्स....

नाशिक/प्रशांत बाफना

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात संपूर्ण राज्य हादरलं. या प्रकरणाचा एसआयटीमार्फत तपास सुरू असून रोज नवनवीन धक्कादायक माहिती समोर येत आहे. अशातच राज्य सरकारने अशोक खरात प्रकरणी तपासासाठी नेमलेल्या एसआयटी प्रमुख तेजस्वीनी सातपुते यांनी तब्बल 17 दिवसांनी पत्रकार परिषद घेत तपासामधील महत्वाची अपडेट दिली आहे. एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते आणि आयपीएस अधिकारी यांनी मंगळवारी (दि.17) पत्रकार परिषद बोलावली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी एसआयटीच्या नियुक्तीपासून ते आजपर्यऐत अशोक खरात प्रकरणाच्या तपासाबाबत सविस्तर माहिती दिली.

तेजस्वीनी सातपुते म्हणाल्या की, अशोक खरातविरोधात आत्तापर्यंत एकूण 12 गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी 9 गुन्ह्यांचा तपास एसआयटी तर 2 गुन्ह्यांचा तपास अहिल्यानगर आणि 1 गुन्ह्याचा तपास नाशिक पोलिस करत आहेत. यात एसआयटीकडे असलेल्या 9 पैकी 8 गुन्हे हे लैंगिक शोषणांसदर्भातले असून 3 गुन्हे फसवणुकीचे असल्याचंही सातपुते यांनी सांगितलं. तसेच आठ आरोपींना




आत्तापर्यंत अटक करण्यात आल्याचंही त्या म्हणाल्या.

अशोक खरातने पीडित महिलांना त्यांच्या कुटुंबातील लोकांच्या मृत्यूची, बदनामीची भीती दाखवून धमकावत महिलांचे लैंगिक शोषण केल्याचंही सातपुते यांनी सांगितलं. तसेच त्यानं लोकांकडून पूजाविधी, खडे, चिंचोके, रुद्राक्ष यांसारख्या माध्यमांतून अंधश्रद्धा पसरवत पैसे उकळल्याचंही एसआयटीच्या तपवासात निष्पन्न झाल्याचं तपास अधिकारी तेजस्वीनी सातपुते यांनी पत्रकार परिषदेत नमूद केलं.

दरम्यान, भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाचा एकूण 24 पथकांकडून तपास सुरू असल्याचंही सांगितलं. या प्रकरणासंदर्भात एसआयटीच्या पथकातील 4 जणांच्या सायबर टीमनं आत्तापर्यंत तब्बल अक्षेपार्ह अशा 4650 लिंक हटवल्याची धक्कादायक माहिती दिली. तसेच सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट पुन्हा पुन्हा टाकणाऱ्या एकूण 451 अकाऊंट कायमस्वरुपी काढून टाकले असून पीडितांचे व्हिडिओ प्रसारित करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याचंही त्या म्हणाल्या.

आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांनी तपासाबाबत महिती दिली. या प्रकरणात आत्तापर्यंत 30 महिलांचे जबाब नोंदवले आहेत. अशोक खरात विराधात आता अनेक महिलांनी हिंमत दाखवली आहे. संबंधित पीडित महिलांनी कुटुंबांना विश्वासत घेऊन धाडस दाखवत पुढे आल्या आहेत. खरातच्या मालमत्तेबाबतचा तपास ईडी आणि एसआयटीकडून संयुक्तरित्या केला जाणार आहे. या 40 ते 45 दिवसांमध्ये 8 गुन्ह्यांचा तपास पूर्ण करणार असल्याचंही सातपुते यांनी सांगितलं आहे

# शहराचा दोन दिवस पाणी पुरवठा

## विस्कळीत, मनपाने केले असे आवाहन...

अहिल्यानगर | प्रशांत बाफना

शहराला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी मंगळवारी सकाळी नांदगाव शिवारात देवनदी जवळ जाधव यांच्या शेतामध्ये हवेच्या व पाण्याच्या दाबाने फुटली. पाणी गळती होत असलेल्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याने मुळानगर येथून होणारा पाणी उपसा बंद करण्यात आला आहे. जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेतलेले आहे. त्यामुळे शहराचा पाणी दोन दिवस विस्कळीत होणार असल्याचे महापालिकेने कळविले असून नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शहर पाणी पुरवठा योजनेची ११०० एम.एम व्यासाची मुख्य जलवाहिनी हवेच्या व पाण्याच्या दाबाने लिकेज झाली आहे. ११०० एम.एम व्यासाची मुख्य जलवाहिनी लिकेज झाल्याने व दुरूस्ती कामासाठी सदर जलवाहिनीद्वारे होत असलेला पाणी उपसा बंद ठेवण्यात आल्याने शहर पाणी वितरण व्यवस्थेच्या टाया पूर्ण क्षमतेने व निर्धारित वेळेत भरणे शक्य होणार नाही.त्यामुळे मंगळवारी रोटेशन नुसार पाणी वाटप सुरू असलेल्या बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील पाईप लाईन रोड, ढवणवस्ती परिसर, वैदवाडी इत्यादी भागाचा पाणी पुरवठा बंद राहणार असून या भागास बुधवारी ८ एप्रिल रोजी पाणी वाटप करण्यात येईल.

तसेच बुधवारी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर इत्यादी भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे

दैनिक लोकआरंभ
बुधवार ८ एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



# सावळदबारा येथे तहसील इमारत बांधकामावर निकृष्ट दर्जाचा आरोप...




सोयगाव ता..
प्रतिनिधी सुनील चोरमले..
...
सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे सुरू असलेल्या तहसील कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामावर स्थानिक नागरिकांनी निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर होत असल्याचा आरोप केला आहे. तडा गेलेल्या विटा, कमी दर्जाचे साहित्य व अपुरा पाया यामुळे इमारतीच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बांधकामस्थळी फलक नसून काम घाईगडबडीत सुरू असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.
नागरिकांनी कामाच्या दर्जाची तातडीने तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, काम पूर्ण होण्यापूर्वी तांत्रिक पाहणी करून गुणवत्ता सुनिश्चित करावी, अशीही मागणी होत आहे. याशिवाय, संबंधित विभागाने नियमित देखरेख न ठेवल्यामुळेच अशा प्रकारचे प्रकार घडत असल्याची टीकाही करण्यात येत आहे.

# सोयगाव तालुक्यात भाजपाचा स्थापना दिवस उत्साहात साजरा..

## सावळदबारसह तालुक्यात मिठाई वाटप व घराघरावर कमळ ध्वज फडकावून जल्लोष



सोयगाव ता..
प्रतिनिधी सुनील चोरमले..

दिनांक 6 एप्रिल सोमवार सोयगाव तालुक्यातील सावळदबारसह संपूर्ण तालुक्यात भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध ठिकाणी पक्ष कार्यकर्त्यांनी एकत्र येत आनंद व्यक्त केला.
भाजपाचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालयात लाडू व मिठाईचे वाटप करण्यात आले.
यावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.
तसेच गावातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या घरांवर पक्षाचे कमळ निशाणी असलेले ध्वज फडकावून स्थापना दिवस साजरा केला. यावेळी पक्षाच्या विचारांचा प्रसार करण्याचा निर्धारही कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.
या कार्यक्रमाला स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



बीड ( प्रतिनिधि):- काँग्रेस पक्षाच्या ही जिल्हा अध्यक्ष निवडीसाठी दिल्लीतून आलेले नितू वर्मा एआयसीसी मेबर यांचे स्वागत करताना युवा नेते फरित देशमुख सोबत शहर अध्यक्ष अल्पसंख्यांक काँग्रेस मोहम्मद खमरोदिन इत्यादी

# वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी मनपा, शहर वाहतूक शाखा ॲक्शन मोडवर

अहिल्यानगर |प्रशांत बाफना
शहराच्या मुख्य बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी आता महापालिका आणि शहर वाहतूक शाखा ॲशन मोडमध्ये आली आहे. सोमवारी सायंकाळी संयुक्तपणे राबवलेल्या मोहिमेत दुकानदार आणि अतिक्रमणधारकांना कडक शब्दांत तंबी देण्यात आली असून, थेट कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. बाजारपेठेत बेशिस्त पार्किंग आणि वाढत्या अतिक्रमणांमुळे नागरिक त्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने नो पार्किंग आणि नो हॉकर्स झोन प्रस्तावित केले आहेत. सोमवारी महापालिकेचे वाहन जप्ती पथक आणि पोलिसांनी बाजारपेठेत फिरून दुकानदार, हातगाडी विक्रेते आणि वाहनचालकांना सूचना दिल्या.
रस्त्यावर अडथळा ठरणारे साहित्य, दुकानाबाहेरील पुतळे तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले.सोमवारी केवळ समज आणि नोटीस दिली आहे, मात्र उद्यापासून कोणत्याही प्रकारची सवलत न देता जप्तीची कारवाई केली जाईल, असे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. काही भागात पे अँड पार्क योजनाही राबवली जाणार असून, वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. यामुळे बाजारपेठेतील रस्ते मोकळे होऊन सर्वसामान्यांचा प्रवास सुखकर होण्याची शक्यता आहे.

# ॲड. तेजस नेहरकर यांनी मांडलेल्या प्रबळ युक्तिवादाने अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

बीड दि.७(प्रतिनिधी)- खासगी शिकवणीला (ट्युशनला) गेलेल्या एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली अटकेत असलेल्या आरोपीला केज न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. याप्रकरणी आरोपीच्या वतीने ॲड. तेजस नेहरकर यांनी मांडलेला प्रबळ बचावाचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने हा निर्णय दिला. या बाबत अधिक माहिती अशी की, पीडित मुलगी ही दहावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. घटनेच्या दिवशी ती सकाळी ६ वाजेच्या सुमारास खासगी शिकवणीसाठी (ट्युशनसाठी) घरातून बाहेर पडली होती. खासगी



शिकवणीचे तास ट्युशन संपल्यानंतर घरी परतत असताना, आरोपी गणेश हनुमान हिंदोळे (रा. केज) व त्याच्या एका सहकाऱ्याने तिचा पाठलाग केला. उमरी रोड, केज परिसरातून तिला लग्नाचे आमिष दाखवून बळजबरीने कारमध्ये बसवून पळवून नेले. आरोपींनी पीडितेला आंबा चोंडी (ता. धारूर) येथील घाटातील डोंगराळ भागात नेले, तिथे तिच्यावर अत्याचार केला. या धक्कादायक घटनेनंतर पीडितेच्या तक्रारीवरून केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तत्परतेने तपास चक्रे फिरवून आरोपींना अटक केली होती. दरम्यान पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण करून केज येथील विशेष न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल केले. या खटल्याचा स्पेशल केस नंबर १३/२०२६ असा आहे. खटल्याच्या सुनावणी दरम्यान आरोपीच्या वतीने जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि तपासातील तांत्रिक बाबींचा विचार करून, माननीय न्यायालयाने आरोपीचा जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. तेजस नेहरकर यांनी प्रबळ कायदेशीर बाजू मांडली. त्यांना या कामी ॲड. जाधव, ॲड. सिकंदर, ॲड. दत्ता केसकर आणि ॲड. रविराज राठोड यांनी सहकार्य केले. बचाव पक्षाने मांडलेले मुद्दे आणि पुराव्यांची स्थिती विचारात घेऊन न्यायालयाने हा जामीन आदेश निर्गमित केला आहे

# जिद्दीच्या जोरावर गाठले यशाचे;ऋतुजा नाईकनवरेची टॅक्स असिस्टंट पदी निवड

## जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते

किल्ले धारूर/अविनाश जगताप
किल्ले धारूर येथील ऋतुजा अशोक नाईकनवरे या कन्येने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत परिसराचा गावचा व आई वडिलांचा अभिमान वाढवला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षेत ओबीसी प्रवर्गातून राज्यात १७ वा क्रमांक मिळवत तिने टॅक्स असिस्टंट या पदावर यश मिळवले असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.
किल्ले धारूर शहरातील ऋतुजा अशोक नाईकनवरे हिने नुकत्याच जाहीर झालेल्या एमपीएससीच्या टॅक्स असिस्टंट पदाच्या निकालात घवघवीत यश संपादन केले. तिच्या या यशामुळे शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.तिच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात कोळपिंपरी येथील महात्मा फुले आश्रम शाळेत झाली.



त्यानंतर तिने किल्ले धारूर येथील हुतात्मा पापा सिंग माध्यमिक शाळेत माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे राष्ट्रमाता जिजाऊ कला वाणिज्य महाविद्यालयात शिक्षण घेत तिने पदवी प्राप्त केली.
स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी तिने पुणे येथे जाऊन युनिक MPSC क्लासेसमध्ये मार्गदर्शन घेतले. योग्य दिशा, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर तिने हे यश मिळवले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तिचे यश प्रेरणादायी ठरत आहे. "जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणतेही लक्ष्य गाठता येते," हा संदेश तिच्या यशातून स्पष्ट झाला आहे.तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, पुढील वाटचालीसाठी तिला हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलचा भव्य वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा 10 व 11 एप्रिलला

## श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलच्या भव्य वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्यास उपस्थित रहा-संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब राठोड.

किल्ले धारूर /अविनाश जगताप
किल्ले धारूर येथील शिक्षण क्षेत्रात नावाजलेल्या श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलतर्फे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून हा सोहळा दिनांक १० एप्रिल व ११ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.
या कार्यक्रमाला धारूर नगरीचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव,धारूर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे,माजी नगराध्यक्ष अर्जुन गायकवाड, सुधीरजी शिनगारे, माजी नगराध्यक्ष स्वरूपसिंह हजारी ,सुधीरजी शिनगारे,सराफा सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष राजेभाऊ निर्मळ, ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, अतुल भैया शिनगारे , गौतम चव्हाण, हनुमंत बप्पा नागरगोजे यांच्या सह धारूर शहरातीलयांची प्रमुख मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.
दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा व सांस्कृतिक गुणांचा अविष्कार या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून सादर केला जाणार असून विविध आकर्षक कार्यक्रमांची रेलचेल



पाहायला मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाट्य,गीत आणि इतर कलागुणांमुळे प्रेक्षकांना एक अविस्मरणीय अनुभव मिळणार आहे.
या सोहळ्यासाठी शाळेच्या वतीने विशेष तयारी करण्यात आली असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.
विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात येत आहे.
या कार्यक्रमास धारूर शहरातील व तालुक्यातील सर्व पालक, व्यापारी वर्ग तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा कला अविष्कार पाहावा व कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब राठोड यांनी केले आहे.

# धारुरात काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न; संघटन सृजन अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद



किल्ले धारूर/प्रतिनिधी
अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या निर्देशानुसार पक्ष संघटन बळकटीसाठी राबविण्यात येत असलेल्या 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत धारूर तालुका काँग्रेस समितीची महत्त्वपूर्ण बैठक ७ एप्रिल रोजी धारूर येथील केज रोडवरील राहुल हॉटेल येथे उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाची सुरुवात प्रशांत शिनगारे यांनी प्रास्ताविक करून केली.अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात जिल्हा व तालुकास्तरावर संघटन बळकट करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर धारूर येथे ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस निरीक्षक अखिल भारतीय काँग्रेस काँग्रेस कमिटी नवी दिल्ली येथील नीतू वर्मा यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत पक्षवाढीसंदर्भातील मते जाणून घेतली. तसेच संघटन निरीक्षक सुरेंद्र गोडजकर, प्रदेश समन्वयक विद्याताई पाटील, बाळासाहेब ठोंबरे, जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण शेप व तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रंदवे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी तालुक्यातील ज्येष्ठ नेते सुबराव सोळंके, महादेव सातपुते, राधाकिसन गवळी, उत्तमराव ढगे, माजलगाव विधानसभा प्रमुख अशोक तिडके, संतोष सावंत, अतुल फुन्ने, जनक फुन्ने, अण्णा गोंने, साथिंदर निक्ते, लोखंडे, शेख शाहनवाज आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यासाठी विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हा व तालुकास्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या निवडीसंदर्भातही महत्त्वपूर्ण विचारविनिमय करण्यात आला.या बैठकीला धारूर तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रंदवे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# पत्रकारांच्या प्रश्नांवर परभणीत धरणे आंदोलन -बळीराज भराडे

जिंतूर/प्रतिनिधी
पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवारी(दि. ७) धरणे आंदोलन करण्यात आले.
पत्रकार सुरक्षा कायदा - २०१९ ची अंमलबजावणी करावी, पत्रकारांवरील हल्ला, धमकावमे आदी प्रकार थांबवण्यासाठी उपाययोजना कराव्या, अधिस्वीकृती बाबतच्या अटी शिथील कराव्या, वर्तमानपत्रांच्या शासकीय जाहिरात दरात वाढ करावी, ज्येष्ठ पत्रकार सन्माननिधीबाबत ३० वर्ष सेवेची अट रद्द करावी, एसटीच्या सर्व प्रकारच्या बसमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना सवलतीचा लाभ द्यावा, अशा विविध मागण्या या आंदोलनात करण्यात आल्या. आंदोलनात व्हाईस मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया, राज्य सहचिटणीस सूरज कदम, राज्य सहसंघटक विजय पाटील, मराठवाडा कार्यकारणी सदस्य सुरेश जंपणगिरे, दिलीप माने, प्रवीण चौधरी, विशाल माने, जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष कैलास चव्हाण आदी पदाधिकारी सहभागी झाले. दरम्यान, जिल्हाधिकारीमार्फत मुख्यमंत्री यांना



मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले.
धरणे आंदोलनात जिल्हाभरातील पत्रकार सहभागी झाले. त्यामध्ये मारुती जुंबडे, बालासाहेब काळे, श्रीकांत देशमुख, राजन मंगरूळकर, विजय कुलकर्णी, सचिन रायपत्रीवार, विष्णू सायगुंडे, नरहरी चौधरी, नेमिनाथ जैन, मंचक देशमुख, दिलीप बोरूळ, भागवत चव्हाण, प्रशांत मुळी, शेख अनवर लिंबेकर, सुभाष सुरवसे, भास्कर लांडे, नारायण सोनटक्के कचरूलाल बारहाते, गजानन घुंबरे, सय्यद युसुफ, शिवाजी वाघमारे, विवेक मुंदडा,




दत्तात्रय कराळे, मंदार कुलकर्णी, दिवाकर माने, लक्ष्मीकांत रासवे, लक्ष्मण कछवे, अनिल अहिरे, सोमनाथ स्वामी, आनंद मुरक्या, भास्करराव चौधरी, रामा ढाकरगे, तुकाराम सर्जे, रंगनाथ गडदे, प्रभाकर कुरे, संग्राम खेडकर, रियाज कुरेशी, शिवाजी बोबडे, रामप्रसाद ओझा, गजानन साबळे, शिवाजी शिंदे, लक्ष्मीकांत सराफ, बाळासाहेब घिके, शे.माबूद, शंकरराव झटे, धनंजय धबाले, शैलेश काटकर, रमेश बिजुले, बाळासाहेब मस्के आदींचा समावेश होता.

# अमेरिका-इराण युद्धबंदीच्या घोषणेनंतर कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या !

## पेट्रोल-डिझेलचे दर होणार कमी ?




मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावामुळे जागतिक ऊर्जा बाजारात गोंधळ निर्माण झाला होता. युद्ध, अशांतता, होमुर्जची सामुद्रधुनी बंद, या व अशा अनेक कारणांमुळे कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडत होत्या. मात्र आता अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धविराम कराराची घोषणा झाली असून त्यामुळे जागतिक बाजाराला मोठा दिलासा मिळाला आहे. युद्धविरामाच्या घोषणेनंतर, कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली असून त्यांचे दर 15 टक्क्यांपर्यंत घसरल्याचे दिसून आले. तर तणावानंतर, ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल 100 डॉलरच्या खाली घसरली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील दोन आठवड्यांच्या करारानंतर, 8 एप्रिल रोजी ब्रेंट क्रूड तेलाची किंमत सुमारे 15.19% ने घसरून प्रति बॅरल 92.67 डॉलर इतकी झाली, तर डब्ल्यूटीआय क्रूड तेलाची किंमतही 15.02% ने घसरून प्रति बॅरल 96.03 डॉलर झाली. मात्र, नंतर त्यात किंचित वाढ झाल्याचेही दिसून आलं. . पुन्हा उघडणार होमुर्जची सामुद्रधुनी तेलाच्या किंमतीत झालेल्या या घसरणीचे सर्वात मोठे कारण म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी (Strait of Hormuz ) पुन्हा उघडण्याचा झालेला निर्णय. हा जलमार्ग जगातील सुमारे 20% तेल आणि एलएनजी पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. इराणने ही सामुद्रधुनी तात्पुरती पुन्हा उघडण्यास सहमती दर्शवल्यामुळे, तेलाचा पुरवठा पूर्ववत होण्याची आशा निर्माण झाली आहे. काय झालं एकमत ?
काल ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करत बेचिराख करण्याची धमकी दिली होती, रात्री 8 वाजता सर्व काही उद्ध्वस्त होईल असा इशारा त्यांनी दिला. मात्र त्यांची डेडलाईन संपण्याआधी काही मिनिटंच दोन्ही देशात युद्धबंदीची घोषणा झाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठं विधान करत इराणवरील हल्ले दोन आठवड्यांसाठी थांबवणार असल्याचे म्हटले. तर दुसरीकडे, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी सांगितले की, काही तांत्रिक मर्यादांचे पालन केले जाईल, तरीही जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीची खात्री दिली जाईल.

## सुरज सुभाष वैद्य यांची संभाजीनगर सिटी पोलीसमध्ये निवड – शिवछत्रपती महाविद्यालयात सत्कार




प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे
शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील क्रीडा व शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने सुरज सुभाष वैद्य यांची संभाजीनगर सिटी पोलीस दलामध्ये यशस्वी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयात त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. महाविद्यालय तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात सुरज वैद्य यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली असून संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. राजू नाना पाटील भुमरे यांनी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, शिस्त व चिकाटी यांच्या जोरावर यश मिळवावे असे प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी सुरज वैद्य यांच्या यशाचे कौतुक करत हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. क्रीडा व शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाचे संचालक डॉ. सुरेश नलावडे यांनी विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची माहिती देत सुरज वैद्य यांच्या यशामागील मेहनतीचा गौरव केला. विभागाच्या सहप्राध्यापिका अरुणा दसपुते-नलावडे यांनी विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते असे सांगितले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, संस्था प्रतिनिधी श्री. सतीश वाघ, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. हेमंत कुमार जैन, डॉ. गांधी, बानायत, डॉ. तुकाराम गावंडे, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. विठ्ठल देखणे, प्रा. नितीन चित्ते, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सुरज वैद्य यांनी आपल्या मनोगतातून यशामागील कठोर परिश्रम, नियमित सराव, आत्मविश्वास व मार्गदर्शन याचे महत्त्व सांगितले. त्यांनी महाविद्यालय व प्राध्यापकांचे मार्गदर्शन हेच आपल्या यशाचे खरे श्रेय असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विभागामार्फत करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा, प्रेरणा निर्माण झाली असून भविष्यात अधिकाधिक विद्यार्थी विविध क्षेत्रात यश मिळवतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## एस.आय.आर.चे काम मतदार नोंदणी अधिकारी यांनी गांभीर्याने घ्यावे :- प्रा. बबनराव आंधळे

*बीड / प्रतिनिधी दिनांक 8 4 2026 एस.आय. आर. प्रक्रिया राबविताना मतदार यादी मध्ये असलेल्या अनेक त्रुटी शासनासह प्रशासनाला लक्षात आलेल्या आहेत मतदार यादी दुरुस्त करण्याकरिता निवडणूक आयोगाकडून सुरू करण्यात आलेली एस.आय.आर प्रक्रिया या प्रक्रियेतील संबंधित प्रशासनिक अधिकारीच याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे दिसून आले सन 2000 च्या असो की 2002 च्या किंवा 2005 प्रत्येक मतदार यादी मयत मतदाराची नावे आहेत विवाह होऊन जिल्ह्यातील बाहेर गेलेल्या महिलांची नावे मतदारांचे पत्ते आणि वय या त भरपूर तफावत आहे या असंख्य चुका असताना अशा सदोष मतदार याद्या घेऊन निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार प्रशासन एस. आय.आर. जिल्ह्यात राबवित असल्याने या सर्व बाबी लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांच्यासह भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त महाराष्ट्राचे राज्यपाल





मुख्यमंत्री गृहमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्य आयुक्त यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय बीड निवडणूक विभाग यांनी दिनांक 30 मार्च 2024 रोजी मतदान नोंदणी अधिकारी किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार यांना संदर्भ देऊन प्रशासकीय पत्र काढले आहे. त्याबाबत दोन्ही अधिकाऱ्याने आपल्या स्तरावरून उचित कार्यवाही करावी असेही पत्र जिल्हाधिकारी यांनी सबंधित अधिकाऱ्यांच्या नावे काढलेले आहे त्याला एक आठवडा होऊन गेला तरीही मतदार नोंदणी अधिकारी साहेब मतदान नोंदणी करीत मतदार यादी दुरुस्त करण्याकरता कोणते पाऊल उचलले मतदार यादी मध्ये एकही मयत मतदाराचे नाव राहणार नाही आणि सन 2000 नंतर विवाहित झालेल्या महिलांचे मतदार यादीत नाव
एस आय आर प्रक्रियेनंतर तयार करण्यात येणाऱ्या नवीन मतदार यादी मध्ये घेण्यापासून वंचित राहणार नाही याकरिता प्रशासनिक अधिकारी म्हणून नेमके काय कार्यवाही करतील याबद्दल एकीकडे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मतदार नोंदणी अधिकारी साहेब मतदान अधिकारी तथा तहसीलदार यांची ही भूमिका शांत असल्याची दिसून येत आहे असे मत ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांनी एका प्रसिद्धी पत्रकात मांडले आहे*

## एकता फाउंडेशन युवक आघाडी राज्याध्यक्षपदी पत्रकार अन्सार शेख यांची नियुक्ती

### [कवी तुकाराम धांडेंच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान]

शिरूर कासार (प्रशांत बाफना) : शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक आणि पर्यावरण क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून राज्यभर अखंड कार्य करणारे एकता फाउंडेशन हे उक्त क्षेत्रातील गुणवंतांसह वंचित, उपेक्षितांसाठीही भरीव कार्य करते. सर्वांना संधी देण्याबरोबरच एकता फाउंडेशनमध्ये जाती, धर्म, पंथ, लिंग, भाषा अशा पारंपरिक भेदाला यत्किंचितही थारा नसून 'सर्वसमावेशक' म्हणून एकता फाउंडेशनची सर्वदूर ओळख निर्माण झाली आहे. एकता फाउंडेशन, म.सा.प.शिरूर कासार आणि पाडळीकर ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने पाडळी ता.शिरूर कासार जि.बीड येथे दोन दिवशीय राज्यस्तरीय एकता मराठी साहित्य संमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

पत्रकार अन्सार शेख हे एक सडेतोड, निर्भिड आणि मुक्त पत्रकार असून दै.सरकारनामाचे संपादकही आहेत. द.युवा ग्रामीण पत्रकार संघाचे ते संस्थापक अध्यक्ष असून ही संघटना राज्यभर काम करत आहे. त्या माध्यमातून पत्रकारांचे अनेकविध प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. त्यांची जिद्द, चिकाटी, कामाप्रती असलेली निष्ठा पाहून एकता कोअर कमिटीने त्यांच्यावर एकता फाउंडेशनच्या युवक आघाडीचे राज्य अध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपवण्याचे ठरवले. त्यानुसार एकता मराठी साहित्य संमेलनात पाठ्यपुस्तकातील लेखक तथा रानकवी तुकाराम धांडे (नाशिक), एकताचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी एकताचे उपाध्यक्ष नितीन कैतके, प्रदेश प्रवक्ता मल्हारी खेडकर, राज्य महिला आघाडी प्रमुख रंजना फुंदे, लता बडे-कराड, सहसचिव लखुळ मुळे, संस्थापक सदस्य राजेश बीडकर, शिवचरित्रकार कैलास तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.





अन्सार शेख यांची एकताच्या युवक आघाडी राज्याध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल एकताचे मार्गदर्शक प्रा.डॉ.भास्कर बडे, उपाध्यक्ष मिरा दगडखैर, सल्लागार एड.भाग्यश्री ढाकणे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ.सचिन सानप, माही शेख, व्यंगचित्रकार दिपक महाले, डॉ.शोभा सानप, रंजना डोळे, हरिप्रसाद गाडेकर, पो.कॉ.ज्ञानेश्वर पोकळे, महादेव राऊत, फौजी कैलास खेडकर, प्रा.महेश नागरे, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, युवक प्रदेश निमंत्रक इम्रान शेख, युवक प्रदेश संघटक बलराम मनिठे, युवती आघाडी एकता हिंदी मंच प्रमुख नेहा कुमावत, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, विभागीय सचिव अंबादास केदार, विभागीय महिला आघाडी प्रमुख प्रा.डॉ.संगीता घुगे, विभागीय संघटक संपादक राजा पुजारी, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष पत्रकार बाळासाहेब कोठुळे, युवक आघाडी विभागीय संघटक सुनिल महाराज केकाण, सातारा जिल्हाध्यक्ष रंजना सानप, नांदेड जिल्हाध्यक्ष एड.सुचिता गिते, परभणी जिल्हाध्यक्ष पु.ना.बारडकर, उपाध्यक्ष मेघा नांदखेडकर, परभणी महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई घुंगरे, बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नागरगोजे, सचिव व्यंगचित्रकार सुहास पालिमकर, कोषाध्यक्ष परशुराम सोंडगे, सहसचिव अंकुश नागरगोजे, पाथर्डी तालुकाध्यक्ष राजेंद्र उदारे, शेवगाव तालुकाध्यक्ष प्रदीप बोडखे, युवक आघाडी शिरूर का.तालुकाध्यक्ष सी.पी.पालवे, विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष कार्तिक कांबळे, द.युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष शकील मनियार तसेच एकता फाउंडेशन कोअर कमिटीतील पदाधिकाऱ्यांसह द.युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे

## "उर्दू रीडिंग प्रोग्राम 3.0" जिल्हास्तरीय सिम्पोजियममध्ये शेख इब्राहिम सरांना 'सामाजिक सहभाग' विषयावर प्रथम क्रमांक

प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे छत्रपती संभाजीनगर : उर्दू रीडिंग प्रोग्राम 3.0 अंतर्गत आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय सिम्पोजियम उत्साहात व शैक्षणिक वातावरणात पार पडला. या सिम्पोजियममध्ये जिल्हा परिषद कोळीबोडखा उर्दू शाळेचे मुख्याध्यापक श्री. शेख इब्राहिम सर यांना "सामाजिक सहभाग" या विषयावर उत्कृष्ट PPT प्रेझेंटेशन सादर केल्याबद्दल जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सिम्पोजियम उद्देशपूर्ण, प्रेरणादायी आणि शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणारा ठरला. कार्यक्रमात शिक्षकांच्या मेहनतीची, सर्जनशीलतेची आणि शैक्षणिक सेवांची मनःपूर्वक दखल घेण्यात आली. विविध विषयांवर प्रभावी सादरीकरण करणाऱ्या शिक्षकांना यावेळी सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी डायट प्राचार्य मा. आर. डी. कांबडे सर, उर्दू विभाग प्रमुख मा. राजेश चौधरी सर, डॉ. तायडे सर, मा. राठोड मॅडम आणि गिरी मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत उर्दू शिक्षणाचा प्रसार व वाचन संस्कृती अधिक बळकट करण्यावर भर दिला. कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी आपले अनुभव, विचार आणि यशस्वी उपक्रम शेअर केले. यामुळे उपस्थितांना मार्गदर्शन मिळाले तसेच भविष्यात अधिक उत्कृष्ट कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. उर्दू रीडिंग प्रोग्राम 3.0 चे उद्दिष्ट पुढे नेण्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी हा सिम्पोजियम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. सर्व पुरस्कार विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!




## विवाहितेला जाच, हुंड्यासाठी छळ, भरदिवसा सोनसाखळी पळवली, चोरी, पतीसह ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

अहिल्यानगर /प्रशांत बाफना माहेरून पैसे आणण्यासाठी आणि पतीचे २० लाख रुपयांचे कर्ज फेडण्यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पतीसह सासू आणि नणंदांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सावेडी येथील पाईपलाईन रोड परिसरात राहणाऱ्या पीडित विवाहितेचा जानेवारी २०१३ पासून छळ सुरू होता. पती गणेश वर्मा आणि सासू यांनी घरखर्चासाठी व पतीवरील २० लाख रुपयांचे कर्ज फेडण्यासाठी विवाहितेकडे माहेरून ६ लाख रुपये आणण्याची मागणी केली होती. विवाहितेने पैसे देण्यास नकार दिला असता, तिला शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली. या छळात पती, सासू यांच्यासह पाच नणंदा आणि दोन आत्यांचाही समावेश आहे. नणंदांनी पतीला फोन करून विवाहितेबद्दल चुकीची माहिती देऊन तिला मारहाण करण्यास चिथावणी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पतीने दारूच्या नशेत विवाहितेला कामावर जाण्यासाठी सक्ती केली आणि "तुझा खर्च तूच कर, आम्ही तुला पैसे देणार नाही" अशी धमकी दिली. आरोपींनी तिला अत्यंत अपमानास्पद वागणूक देऊन एका भाड्याच्या खोलीत राहण्यास भाग पाडले. ५ एप्रिल रोजी पतीने विवाहितेसह तिच्या आईला आणि मुलांनाही बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. या सततच्या त्रासाला कंटाळून विवाहितेने अखेर पोलिसांत तक्रार दिली. तोफखाना पोलिसांनी या प्रकरणी पती गणेश वर्मा, सासू मंगला वर्मा आणि इतर नातेवाईकांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी करत आहेत. हुंड्यासाठी छळ करून अकरा लाखांची मागणी; पतीसह सहा जणांवर गुन्हा दाखल अहिल्यानगर – सासरी नांदत असताना विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून, घराच्या फर्निचरसाठी आणि हॉटेल व्यवसायासाठी अकरा लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी करत मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित विवाहितेचा विवाह झाल्यानंतर २०१७ ते २०२५ या कालावधीत सासरी नांदत असताना हा प्रकार घडला. आरोपींनी संगनमत करून विवाहितेला नेहमी शिवीगाळ व दमदाटी केली. घरामध्ये नवीन फर्निचर बनवण्यासाठी आणि हॉटेलचा व्यवसाय सुरू करण्यासाठी माहेरून अकरा लाख रुपये घेऊन येण्याची मागणी सासरच्या मंडळींनी लावून धरली होती. ही मागणी पूर्ण होत नसल्याने विवाहितेची उपासमार करून तिला क्रूरतेची वागणूक देण्यात आली. पीडितेला आरोपींनी मारहाण करत घराबाहेर हाकलून दिले, तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली. या छळाला कंटाळून अखेर विवाहितेने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी या तक्रारीवरून पती, सासू, दीर, जाऊ, नणंद आणि नंदवा अशा एकूण सहा जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार महिला जखमी; अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल अहिल्यानगर: शहर परिसरातील बाबावाडी भागात रस्ता ओलांडताना एका भरधाव टेम्पोने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार महिला गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात महिलेच्या पायाला मोठी दुखापत झाली असून त्यांच्या दुचाकीचेही नुकसान झाले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोहिनी किरण खाकाळ या आपल्या मुलासह ज्युपिटर दुचाकीवरून अमरधाम रस्त्याने जात होत्या. रिमांड होमसमोर त्या फोनवर बोलण्यासाठी थांबल्या असताना पाठीमागून येणाऱ्या अशोक लेलंड कंपनीच्या टेम्पोने (एम एच १६ ए वाय १२२२) त्यांच्या गाडीला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की मोहिनी खाकाळ रस्त्यावर पडल्याने त्यांच्या डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली. अपघात केल्यानंतर टेम्पो चालक जखमी महिलेला कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पसार झाला. जखमी महिलेने तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचार घेतले आणि त्यानंतर पोलिसांत धाव घेतली. कोतवाली पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात टेम्पो चालकाविरोधात निष्काळजीपणे गाडी चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे. पोलीस आता या फरार चालकाचा शोध घेत आहेत. बुरुडगाव रोडवर भरदिवसा महिलेची सोनसाखळी हिसकावली; अडीच लाखांची मोहनमाळ लंपास अहिल्यानगर: शहरातील बुरुडगाव रोडवरील शिवाजी हाउसिंग सोसायटी परिसरात एका अज्ञात दुचाकीस्वाराने पायी चालणाऱ्या महिलेच्या गळ्यातील २ लाख ५० हजार रुपये किमतीची सोन्याची मोहनमाळ बळजबरीने हिसकावून नेली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. बुरुडगाव रोडवरील केशर गुलाब मंगल कार्यालयासमोर सोमवारी सायंकाळी ७ च्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी यांची आई घरासमोरील गल्लीत पायी फिरण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या एका अनोळखी इसमाने, ज्याने अंगात काळे जॅकेट आणि डोक्यावर हेल्मेट घातले होते, त्याने वृद्ध महिलेच्या गळ्यातील ५ तोळे वजनाची सोन्याची मोहनमाळ काही समजण्यापूर्वीच हिसकावून पळ काढला. भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फिर्यादी विवेक खाकाळ यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०४ (२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील आणि शीतल मुगडे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले जात आहे. पिंपळगाव कौडा येथे झोपेत असलेल्या महिलेचे दागिने हिसकावले; चोरटे फरार अहिल्यानगर: नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथे घरासमोर झोपलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी बळजबरीने हिसकावून चोरून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com